नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 07/01/2022 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीस अटक स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

म. उच्च न्यायालय नागपूर यांनी Sumoto Public Intrest Litigation No- 1/2021 अन्वये जिल्हा घटक प्रमुखांना न्यायलय मांजावर कायदेशीर कार्यवाही करण्याचे निदेर्ष दिले. तसेच शासनाकडून प्रतिबंधीत नायलॉन सरास वापर होत असल्यामुळे मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखा यांना नायलॉन मांजा वर कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्या अनुषंघाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे दिनांक 07/01/2022 रोजी कन्हान उपविभागातील पो. स्टे. खापरखेडा हद्दीत गस्त करीत असतांना माहितगार कडून गोपनीय माहिती मिळाली की, खापरखेडा टाऊन मध्ये ओम साई भंडार नावाचे दुकानातील इसम अवैध नायलॉन मांजा साठा करून विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने वरील खापरखेडा टाऊन मध्ये ओम साई भंडार दुकानाची प्रतिबंध नायलॉन मांजा संदर्भात झडती घेतली असता आरोपी नामे– कार्तिक अंबादास बुंदेले, वय 28 वर्ष, रा. वार्ड क्र. 2, खापरखेडा याचे ताब्यातून पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळून आला ते खालील प्रमाणे––

1) पांढऱ्या रंगाच्या प्लॉस्टीक बोरी मध्ये 33 नग प्रतिबंधीत प्लॉस्टीक चक्रीत नायलॉन गुंडाळलेल्या प्रतीबंधीत मांजाचे मोठया चक–या कि. 16,500/–रुपये, 2) मोनोकाईट कंपनीचे लेबल असलेले प्रतीबंधीत नायलॉन मांजा रोल 7 नग कि. 4,200/–रू. 3) गोल्ड कंपनीचे लेबल 5 नग प्रतीबंधीत नायलॉन रोल मांजा रोल 5 नग कि. 4,000/–रू, 4) टुनटुन कंपनीचे लेबल असलेले प्रतीबंधीत नायलॉन मांजा रोल 2 नग कि. 1,600/–रु. व 5) लहान प्लॉस्टीक रोल मध्ये प्रतीबंधीत नायलान मांजा 42 नग कि. 2,100/–रू. असा एकुण किंमत 28,400/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनि अनिल राऊत यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 5, 15 पर्यावरण कायदा सन 1986 सहकलम 188 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील योग्य कायदेशीर कारवाईस्तव पोलीस स्टेशन खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात स.पो.नी. अनिल राऊत, पो.हवा. ज्ञानेश्वर राऊत, पो.हवा. अरविंद भगत, पोना शैलेश यादव, वीरेंद्र नरड, चासफौ साहेबराव बहाले यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर